लोकमत | गोवा, मंगळवार, २ नोव्हेंबर २०१०

व बेन्सन फर्नांडिसने गोल केले.

# कर्मा एंड्युरो चॅरिटी कार रॅली उद्यापासून

**पणजी :** कर्मा एंड्युरो चॅरिटी चॅलेंज रॅली २०१० मोहिमेस कोलवा येथून उद्या २ रोजी प्रारंभ होणार आहे. या रॅलीत केवळ दणकट अशा दोन डझन ॲम्बासिडर गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ अशा पश्चिम घाटातून दोन आठवडे मार्गक्रमण करणार आहे. उद्या कोलवा येथे या रॅलीचा वॉर्म अप राउंड होणार असून प्रत्यक्ष रॅली ३ रोजी बे वॉच रिसॉर्ट, कोलवा येथून सुरू होणार आहे. या रॅलीचा समारोप केरळमध्ये होणार आहे. जगभरातून निधी संकलनासाठी अशा साहसी मोहिमांचे आयोजन करणाऱ्या ब्रिटनस्थित ग्लोबल एंड्युरो या आस्थापनाने या रॅलीचे आयोजन केले असून त्यातील बहुतेक स्पर्धक हे न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, कॅनडा येथील आहेत.